अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. २२ मे २०२५ | वर्ष १० वे | अंक ४१ वा | ब्रम्हपुरी | पाने ६ | किंमत २ रूपये

## ब्रम्हपुरीत भव्य तिरंगा रॅली, सैनिकांचे कौतुक; पाकचा निषेध

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारताचे नंदनवन असलेल्या जम्मू-काश्मीरमधील पहलगाम याठिकाणी येथे दहशतवाद्यांनी पर्यटनासाठी गेलेल्या भारतीय नागरिकांवर हल्ला केला, त्यात २६ भारतीयांचा मृत्यू झाला. २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर अवघा देश हळहळला होता. या भ्याड दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून भारताकडून पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी ठिकाणांवर एअरस्ट्राइक करण्यात आला. या कारवाईला 'ऑपरेशन सिंदूर' असे नाव देण्यात आले. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवून अनेक दहशतवाद्यांचे प्रशिक्षण अड्डे, हवाई अड्डे, सायबर हल्ले, तसेच पाकिस्तानने केलेल्या अनेक कारवायांचे प्रतिउत्तर देण्याचे मोठे कार्य भारतीय सेनेने केले. दरम्यान पहलगाम हल्ल्यात ज्यांची निघृण हत्या करण्यात आली त्या नागरिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व भारतीय सैनिकांच्या शौर्याला व त्यांच्या अतुलनीय पराक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी त्याच्या कार्याला सलाम करण्यासाठी ब्रम्हपुरी तालुक्यातील सामाजिक संघटना, राजकीय पक्ष, विद्यार्थी,





विद्यार्थिनी, महिला वर्गाच्या वतीने काल दिनांक २० मे २०२५ दुपारी ४:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. ५०० फुट लांबीचा भारतीय तिरंगा ध्वज हे रॅलीचे विशेष आकर्षण होते.

यावेळी इंदिरा गांधी चौक येथे भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान व 'आयरन लेडी' इंदिरा गांधी यांच्या शिल्पाकृती पुतळ्याला ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांनी माल्यार्पण केले. यावेळी तिरंगा रॅली आयोजन समितीच्या वतीने विशेष आकर्षण म्हणून 'ब्रम्होस' क्षेपणास्त्राची प्रतिकृतीचा देखावा साकारण्यात आला होता. तसेच भारत मातेच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थीनीच्या झाॅकीने सगळ्या ब्रम्हपुरीकरांचे लक्ष वेधले. प्रसंगी आयोजन समितीच्या वतीने माजी सैनिकांचा गौरव करण्यात आला. सदर रॅलीतील तिरंग्यावर नागरिकांच्या वतीने पुष्पांचा वर्षाव करण्यात आला. 'भारत माता की जय, वंदे मातरम' अशा जयघोषाने ब्रम्हपुरी शहर दुमदुमले. शहरातील प्रमुख चौकातून रॅलीचे मार्गक्रमण झाले. यावेळी

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## अवकाळी पावसाच्या तडाख्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यात मंगळवार दि. २० मे ला अवकाळी पाऊस पडला. अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. काल दिवसभर ढगाळ वातावरण बनून होते. त्यानंतर दुपारी ०४ वाजताच्या सुमारास तालुक्यातील काही ठिकाणी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. तर अवकाळी पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर अवकाळीचे संकट आले आहे. परंतु


(फाईल फोटो)

शेतकऱ्यांचे हे आश्रू पुसणार कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

उन्हाळयात ब्रम्हपुरी तालुक्याचा पारा गरम झाला असताना अचानक आलेल्या पावसाने मात्र वातावरणात गारवा निर्माण केला आहे. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरवला गेला आहे. ब्रम्हपुरी तालुक्यात तीन ते चार दिवसांपासून ढगाळ वातावरण असून सायंकाळच्या सुमारास गारवा जाणवत आहे. ब्रम्हपुरी तालुक्यात काल वादळी वाऱ्यासह अचानक आलेल्या अवकाळी पाऊसामुळे शेत शिवारात असणारे धान पीक उद्धवस्त झाले आहे. तालुक्यातील चिखलगांव, लाडज, सोंदरी, सुरबोडी, पिंपळगांव या गावात भाजीपाला, उन्हाळी धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. धान व भाजीपाला पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळत असल्याने उभी असलेली धान पिके आडवी पडली आहेत. शेतकऱ्यांचा लाखो रुपयांचा खर्च पाण्यात गेला आहे. त्यामुळे प्रशासनानं तात्काळ पंचनामे करावे, अशी मागणी चिखलगांव, लाडज, सोंदरी, सुरबोडी, पिंपळगांव येथील शेतकऱ्यांनी केली आहे.




## तलावाची पाळ दुरूस्तीची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

मालडोंगरी ग्रामपंचायत अंतर्गत धानोली (तुकुम) येथील मामा तलाव जुलै २०२४ मध्ये मध्यभागी फुटला. त्यामुळे तलावाचे पाणी शेजारील शेतात शिरल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. सदर तलावाची फुटलेली पाळ त्वरीत दुरूस्त करण्यात यावी, अशी मागणी मालडोंगरीच्या सरपंच मंजुषा ठाकरे यांनी पत्रपरिषदेतून केली.

तलावाची पाळ त्वरीत दुरूस्त करून देण्यासंदर्भात मुख्यकार्यपालन अधिकारी जि.प. चंद्रपुर, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी जि.प. लघू पाटबंधारे विभाग यांना अनेकदा निवेदने देण्यात आली. परंतू प्रशासनाने याकडे अक्षम्य दुर्लक्ष केले. आजची स्थिती कायम राहिल्यास

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## संपादकीय...

# मुलांनो मैदानात या...

आजचे युग हे विज्ञान तंत्रज्ञानाचे युग समजले जाते. २१ व्या शतकातील या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात स्मार्ट फोन, इंटरनेट हे प्रत्येकाच्या जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. केवळ घरातील मोठ्या माणसंकडेच नव्हे तर शाळकरी मुलांकडे देखील मोबाईल फोन पाहायला मिळत आहे. कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी पालकांनी घेऊन दिलेला मोबाईल अजूनही मुलांच्या हातात आहे. हाच मोबाईल आज मुलांचा सर्वात जवळचा सहकारी बनला आहे. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत मुले मोबाईललाच चिकटून बसलेली असतात. आजच्या विज्ञान तंत्रज्ञान युगात मोबाईल हा गरजेचा आहे. तो गरजेपुरातच वापरला गेला पाहिजे मात्र आज मुलांसाठी मोबाईल हेच सर्वस्व होऊन बसले आहे. आजच्या मुलांना मोबाईलने भुरळ घातली आहे. दिवसातील पाच ते दहा तास मुले मोबाईल वरच असल्याने मुलांची शारीरिक व बौद्धिक वाढ खुंटत चालली आहे त्यामुळे मुलांचे बालपण हरवत चालले की काय अशी शंका मनात येते.

आजची मुले जास्त प्रमाणात टीव्ही, संगणक, मोबाईल, इंटरनेट, व्हिडीओ गेम, व्हाट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम यासारख्या सोशल मीडियात दंग असतात. तंत्रज्ञानरुपी राक्षसानं मुलांचं बालपणच खाऊन टाकलंय. पूर्वी शाळांना सुट्ट्या लागल्या की गावागावातील मैदाने मुलांनी भरून गेलेली असायची पण आज ती मैदाने विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात ओस पडली असल्याचे चित्र पाहायला मिळते. क्रिकेट वगळता एकही मैदानी खेळ खेळताना मुले दिसत नाहीत. देशी खेळ तर आजच्या मुलांना माहीतच नाहीत. गोट्या, भोवरे, विटीदांडू खेळताना कोणी दिसत नाही. आट्यापाट्या आणि सुरपारंब्या या खेळाचे नियम तर सोडाच पण नावही आजच्या मुलांना माहीत नाही. मोठे रिंगण घेऊन त्यात गोट्यांचा डाव लावल्याचे चित्र आज पाहायला मिळत नाही. गलगुट करून खेळणे व त्यावर राज्य द्यावे लागल्याचे हल्लीच्या मुलांमध्ये ऐकिवातही नाही. भोवऱ्याच्या रिंगणाचीही तीच अवस्था. दगडावर आरी घासून भोवयाला टोक करीत बसलेला मुलगा शोधूनही सापडेनासा झाला आहे. जुन्या कपड्यांचा चेंडू तयार करून खेळला जाणारा रप्पाधप्पीचा खेळ हल्लीच्या मुलांना माहीतही नाही. लपंडाव, विटीदांडू, लगोरी, कुरघोडी, चंपूल, उडाणटप्पू हे खेळ आता दुर्मिळ झाले आहेत. लंगडी हा खेळ आता फक्त शाळेतील पिटीच्या तासापूरता उरला आहे. या खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम व्हायचा शिवाय संघभावना, एकी, आपुलकी, नेतृत्व हे गुण या खेळांमुळे मुलांमध्ये विकसित व्हायचे.

या खेळाची जागा आता टीव्ही, संगणक, मोबाईल व्हिडीओ गेम यांनी घेतली आहे. टीव्ही, संगणक, व्हिडीओ गेममुळे मुलांना विविध खेळांची माहिती उपलब्ध होऊन त्यातून मुलांचा बौद्धिक विकास होतो असे वाटत असले तरी त्यांचा शारीरिक विकास खुंटत चालला आहे याचा समाजातील सर्व घटकांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. मुलांना पुन्हा मैदानाकडे आणण्याची जबाबदारी पालक, शिक्षक व समाजातील सर्वच घटकांची आहे.

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर,
विद्यानगर, ब्रम्हपुरी
: जाहिरातीसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८२७५७७५३७५

नियमित वाचा - अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# नेवजाबाई हितकारिणी विद्यालयात एचएससी व एसएससी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्था,



ब्रह्मपुरी द्वारा संचालित नेवजाबाई हितकारिणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, ब्रह्मपुरी येथे एचएससी (बारावी) व एसएससी (दहावी) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

सदर कार्यक्रमास संस्थेचे सचिव अशोक भैया, मुख्याध्यापक के.एम. नाईक सर, उपमुख्याध्यापक एन.डब्ल्यू. नाकाडे सर, तसेच पर्यवेक्षक प्रा. पी.आर. जिभकाटे सर यांची प्रमुख उपस्थिती होती. एचएससी (बारावी) परीक्षेत मधुर खुशाल तोंडरे – प्रथम क्रमांक, जसवंत वीपासू बुद्धे – द्वितीय क्रमांक, तुषार विनायक मिसार – तृतीय क्रमांक तर एसएससी (दहावी) परीक्षेत हर्षल होमराज पगाडे – प्रथम क्रमांक (९४.२० टक्के), साहिल राऊत व हर्षल विखार – द्वितीय क्रमांक (९० टक्के), कृणाल सूर्यवंशी – तृतीय क्रमांक (८९.८० टक्के) या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी मुख्याध्यापक श्री. नाईक सर यांनी विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण निकालाची माहिती दिली व यशामागील शालेय प्रयत्नांचे विश्लेषण मांडले. शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी विद्यार्थ्यांच्या यशाचे व शिक्षकांच्या योगदानाचे मन:पूर्वक कौतुक केले , विद्यार्थ्यांचे यश हे शिक्षकांचे मार्गदर्शन व विद्यार्थ्यांची मेहनत यांचे सुंदर फलित असून अशा कार्यक्रमांमधून त्यांच्या कार्याचे योग्य मूल्यमापन घडते, असेही ते म्हणाले . शेवटी सर्वांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन देशमुख मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन उरकुडे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचे मोलाचे सहकार्य लाभले.

# विकासाच्या नावाखाली ब्रम्हपुरीकर त्रस्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात सध्या भूमिगत गटार योजनेचे काम सुरू आहे. या योजनेमुळे शहरातील अनेक भागांत नुकतेच तयार केलेले रस्ते पुन्हा फोडले जात आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप आणि नाराजी वाढली आहे. काही महिन्यांपूर्वी नगर परिषदच्या माध्यमातून शहरातील अनेक भागात सिमेंट आणि डांबरीकरणाचे रस्ते बनवण्यात आले होते. यातील काही रस्ते तब्बल १५-२० वर्षांनंतर चांगले सिमेंटीकरणाचे झाले होते. मात्र, आता गटार पाईपलाईनसाठी हेच रस्ते फोडले जात आहेत. आधी गटारी योजनेची माहिती होती, तर मग नवीन रस्ते कशासाठी? हे फक्त पैसे वाया घालवण्याचे काम नाही का?, अशी भावना शहवासीयांमध्ये निर्माण झाली आहे. करा आणि पुन्हा फोडा या पद्धतीतून विकास नव्हे, तर निधीचा गैरवापरच होत आहे. सत्ताकाळ संपल्यानंतर अनेक माजी पदाधिकारी जबाबदारी टाळत आहेत. आता आमची सत्ता नाही, असे म्हणत पळवाट काढली जाते. पण, जेव्हा संपूर्ण गावात भूमिगत गटारीसाठी खोदकाम होणार असल्याचे माहीत होते, तर आधीच रस्त्यांचे नूतनीकरण करण्याची गरज काय होती?, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

वाढीव पाणीपुरवठा योजना, स्वच्छता अभियान, नाल्यांचे बांधकाम, रस्त्यांचे डांबरीकरण या सगळ्या कामांनी नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळावा, अशी अपेक्षा होती. पण, प्रत्यक्षात झाले उलटेच. पाणीपुरवठा योजनेचे लोकार्पण झाले, तरी अनेक भागांत अजूनही नियमित पाणी मिळत नाही. कुठे तीन-तीन वेगवेगळ्या जलवाहिन्या असूनही पाण्याची कमतरता आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी कठीण होऊ शकते. शहरातील नाल्या अजूनही कचऱ्याने भरल्या आहेत. काही नागरिक कचरा नियमितपणे गाडीत टाकतात, पण, अनेकजण रस्त्यावरच कचरा टाकतात. त्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याचे दिसून येत आहे.

विकासाच्या नावाखाली ब्रह्मपुरीकरांची फक्त फरफट होत आहे. पैसे खर्च होतात, रस्ते फोडले जातात पण, सोय न होता त्रास वाढतो. हा खरंच विकास आहे का? की फक्त राजकारण आणि निधीचा खेळ?, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

## विनोदिनी

संध्याकाळचा चहा झाल्यावर पत्नी एका हातात ५-६ औषध्यांच्या गोळ्या आणि पाण्याचा ग्लास घेऊन नवऱ्याजवळ जाते.

पती : एवढ्या गोळ्या कशासाठी?

पत्नी : अरे, तुझे हातपाय दुखताहेत ना?

पती : नाही...

पत्नी : अरे, मग डोकं दुखत असेल...?

पती : नाही...

पत्नी : मग, सर्दी... खोकला... ताप...?

पती : नाही, नाही, नाही...

पत्नी : मग, अंग ठणकत असेल...

पती : नाही गं, मला काहीही झालेले नाही...

पत्नी : खरंच..?

पती : हो. मी एकदम ठणठणीत आहे.

पत्नी : तर मग चल शॉपिंगला...!!!

# नागभीड तालुक्यात २९ हजार लाडक्या बहिणींपैकी १३३ ठरल्या अपात्र

## शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या ९०० महिलांना ५०० रूपयांवर आणले

नागभीड/प्रतिनिधी

निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेतून नागभीड तालुक्यातील २९ हजार लाडक्या बहिणी पैकी १३३ महिला ठरल्या अपात्र, पुन्हा लाभार्थी मध्ये अपात्रतेचा आकडा वाढणार आहे', अशी माहिती आहे. निराधार योजनेच्या लाभार्थी असलेल्या ६६ महिला तर चारचाकी वाहने असणाऱ्या व आयकर भरणाऱ्या ६७ महिला अशा एकुण १३३ लाडक्या बहीणी या योजनेतून वगळण्यात आल्या आहेत. तसेच नमो शेतकरी योजनेचा व लाडक्या बहिणी या दोन्ही योजनांचा फायदा घेणाऱ्या ९०० महिलांना ५०० रुपयावर आणले आहे. नमो शेतकरी योजनेचा फायदा घेत असेलेल्या २७०० महीला लाभार्थीपैकी जवळपास ९०० महिलांना या योजनेतून १००० रुपये आधीच मिळत असल्याने अशा लाभार्थ्यांना फक्त वरचे ५०० रुपये देऊन १५०० रुपयांपर्यंतचा फरक भरून काढला जात आहे.



या योजनेचा अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांना लाभ दिला जात आहे. त्यासाठी सरकारने आयकर विभागाकडून माहिती मागवली आहे. त्यानुसार अर्जाची छाननी चा कार्यक्रम सुरु राहणार आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिला असतील, तर लाभ मिळणार नाही. चारचाकी वाहनं असणाऱ्या महिलांच्या अर्जाची पडताळणी करणे सुरु आहे. अशा महिला लाभ घेत असतील, तर त्यांना यापुढे लाभ मिळणार नाही.

### तर... लाभार्थीमध्ये अपात्रतेचा आकडा वाढणार

चौकशी मध्ये शासकीय योजनेचा डबल लाभ घेणाऱ्या ६६ महिला निघाल्या आहेत. यामध्ये त्यांचा लाडक्या बहिणी या योजनेतून वगळण्यात आले. यापुढे आमची चौकशी सुरू राहणार आहे आणि निराधार योजनेसाठी नवीन अर्ज करणाऱ्या महिलांना सुद्धा महिला व बाल विकास कार्यालयाकडून लाडक्या बहिणीचा लाभ घेत नसल्याचा प्रमाणपत्र आणल्याशिवाय आम्ही त्याचा अर्ज पास करणार नाही.

**– सुनिल भानारकर, नायब तहसीलदार सं.गां.यो., नागभीड**

# यशाची शिखरे पादाक्रांत करीत राहा – प्रा. देशकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी शहराच्या अगदी जवळ ऐतिहासिक दृष्ट्या लौकिकसंपन्न असलेल्या मालडोंगरी गावात साहिल लता रामभाऊ निहाटे यांनी नुकतीच ऐतिहासिक कामगिरी करून आई-वडील आणि गावाचे नाव नाही तर तालुक्याचेही नाव रोशन केले आहे. त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग २०२३ (एमईएस) या परीक्षेमध्ये एस. सी. कॅटेगिरी मधून प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्यामुळे साहिलवर आणि त्याच्या आई-वडिलांवर अभिनंदनाचा वर्षाव सुरू होत आहे.

ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार प्रा.अतुलभाऊ देशकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह साहिलच्या घरी प्रत्यक्ष भेट देऊन साईलचे कौतुक केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यशाची प्रत्येक शिखरे पादाक्रांत करीत रहा, आम्ही सदैव तुझ्या सोबत आहोत. मात्र स्वत: मेहनत घेऊन मुलाचे स्वप्न साकार करणाऱ्या आई-वडिलांना मात्र कधीच दुरावू नकोस, असा मौलिक सल्ला देखील दिला. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष प्राचार्य अरुण शेंडे, भाजपा महिला जिल्हा अध्यक्षा वंदनाताई शेंडे, भाजपा जिल्हा सचिव साकेत भानारकर, माजी सभापती प्रा.रामलाल दोनाडकर, शहर महामंत्री मनोज भूपाल, भाजपा ज्येष्ठ नेते पांडुरंग भोयर, माजी उपसरपंच चुमदेव जांभुळकर यांचे सह त्याचे आई-वडील, काका-काकू व आप्तेष्ठ उपस्थित होते.

# ने.हि. महाविद्यालयात स्व. नेवजाबाई भैया पुण्यतिथी व छत्रपती संभाजी महाराज जयंती



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात संस्थेचे प्रेरणास्थान स्व.नेवजाबाई भैया यांच्या पुण्यतिथी व छत्रपती संभाजी महाराज जयंती कार्यक्रम नुकताच आयोजित करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्य.प्राचार्य डॉ. सुभाष शेकोकर, डॉ. राजेंद्र डांगे, मेजर प्रा. विनोद नरड व अधीक्षक संगीता ठाकरे यांनी प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

त्यानंतर डॉ. पद्माकर वानखडे, प्रा. रुपेश वाकोडीकर, प्रा. सोनाली पारधी, शशिकांत माडे, प्रज्ञा मेश्राम, विलास खोब्रागडे, अक्षय चहांदे इत्यादींनी प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले. यशस्वीतेसाठी समिती सदस्य प्रदीप रामटेकेनी मोलाचे सहकार्य केले.

# आयटकची पंचायत समितीवर धडक

## कोरोना काळातील थकीत प्रोत्साहन भत्ता त्वरीत देण्याची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन संलग्न आयटक ब्रम्हपुरी तालुका कौन्सिल च्या वतीने, आशा व गट प्रवर्तक यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा द्या, किमान वेतन लागू करा, दिवाळी बोनस दरवर्षी दोन हजार रुपये देण्यात यावे, कोरोना थकीत मानधन ग्राम पंचायत, नगर परिषद कडून तातडीने देण्यात यावे व केंद्र सरकारचा जानेवारी पासून थकित असलेला मोबदला त्वरित द्या यासह अन्य मागण्यांसाठी देशव्यापी आंदोलनाची हाक दिली होती त्या नुसार आयटक चे राज्य सचिव कॉ.विनोद झोडगे पाटील यांच्या मार्गदर्शनात दिनांक २० मे २०२५ रोजी पंचायत समिती कार्यालय वर धडक देत मा.गट विकास अधिकारी यांच्या मार्फत मा.पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

सप्टेंबर २०१८ पासून केंद्र शासनाने मोबदल्यामध्ये कोणती वाढ केली नसून कोरोनाच्या काळात आशा वर्कर व गटप्रवर्तक कडून महत्त्वाचे काम करून घेतल्यानंतर सुद्धा ३१ महिन्याचा दरमहा १००० रू.थकीत मोबदला आतापर्यंत जिल्यातील अनेक ग्राम पंचायत, नगर परिषद व नगर पंचायत ने दिलेला नाही त्याची तातडीने अमंलबजावणी करावी. आशा व गट प्रवर्तक यांना रिटायरमेंट नंतर ५ लाख रुपये ग्रॅज्युटी, १० हजार रुपये मासिक पेन्शन व २ हजार रुपये दिवाळी बोनस आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना मिळावा तसेच त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन किमान वेतन लागू करण्यात यावे, याशिवाय अन्य मागण्या यावेळी करण्यात आल्या.

निवेदन देताना आयटक तालुका अध्यक्ष कॉ. ज्योत्स्ना ठोंबरे, हिरकण्या सोनुले, पतिता साखरे, साधना नाकतोडे, सुषमा धोटे, गीता मेश्राम, भावना आंबोने यासह आशा व गट प्रवर्तक कर्मचारी उपस्थित होत्या.

# दिव्यांग समस्या संवाद सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद

ब्रम्हपुरी/का.प्र.

दिव्यांग व्यक्तीला समाजाच्या विकासात्मक प्रवाहामध्ये आणणे. शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचाविणे, योजना, कायदे यांची माहिती देणे, असा संवाद करण्यासाठी एक दिवसीय दिव्यांग व्यक्तीचे अधिकार, हक्क, शासकीय योजना विषयक जाणीव-जागृती संवेदनशील कार्यशाळा दिनांक १६/०५/०२५ रोज शुक्रवारला आम्ही आमच्या आरोग्यासाठी संस्था कुरखेडा एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय तालुका ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये अंगणवाडी सेविकांसोबत घेण्यात आली.

या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक म्हणून दिव्यांग व्यक्तीचे अधिकार विषय समन्वयक संगिता तुमडे, सामाजिक उधमशीलता विकास प्रकल्पाचे समन्वयक अमीर तूराळे, विवेक राऊत, अशोका नेत्रालय ब्रम्हपुरीचे डॉ. स्वप्नील कवठे आणि डॉ. रोहिणी कवठे उपस्थित होते.

कार्यशाळेची प्रस्तावना प्रेरणा गेडाम यांनी तर आभार अनिता बावनकर यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्प आणि तहसील कार्यालय ब्रम्हपुरी यांचे मोलाचे सहकार्य लाभले .

# ब्रम्हपुरीतील 'बंटी-बबली'ने नोकरीचे आमिष देत घातला ६५ लाखांचा गंडा

## पेट्रोलपंपची डीलरशिप मिळवून देण्याचे आश्वासन, लाखांदूर पोलिसांत गुन्हा नोंद

लाखांदूर/प्रतिनिधी

दोन व्यक्तींना सरकारी नोकरी मिळवून देण्याचे आणि एकाला पेट्रोल पंपची डीलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवून ब्रह्मपुरीतील कथित 'बंटी-बबली'ने ६५.१४ लाख रुपयांचा गंडा घातला. आपण फसविले गेल्याचे लक्षात आल्यावर या तिघांनीही या जोडीविरुद्ध पोलिसात तक्रार दाखल केली. मात्र हे जोडपे ब्रह्मपुरीतून पसार झाले आहे.

रोशनी नाकतोडे (२९) आणि रोमल नाकतोडे (३७), दोघेही विदर्भ कॉलनी, मालडोंगरी रोड, ब्रह्मपुरी, जि चंद्रपूर अशी या आरोपी दाम्पत्याचे नाव आहे. पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध फसवणुकीच्या कलमांखाली गुन्हा दाखल केला असून त्यांचा शोध घेतला जात आहे. १ एप्रिल २०२२ ते ४ एप्रिल २०२४ या कालावधीत रोशनी आणि रोमल यांनी लाखांदुरातील वॉर्ड क्रमांक ११ मधील शिवनगरी लेआउट येथे राहणारे रूपेश गावतुरे (४६) यांना पेट्रोल पंपची डीलरशिप देतो, असे सांगून ५३ लाख २८ हजार ८३७ रुपयांचा गंडा घातला.

रूपेश यांचा मेहुणा नितेश गुरनुले हा देखील या दाम्पत्याच्या संपर्कात आला. त्यालाही सरकारी नोकरी मिळवून देण्याच्या नावाखाली थाप मारून त्याच्याकडूनही ५३ हजार २८९ रुपये घेतले. एवढेच नाही तर, समीर ब्राह्मणकर यालाही ग्रामसेवकाची नोकरी मिळवून देण्याच्या बहाण्याने ११ लाख ३२ हजार रुपयांनी गंडा घातला. दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही ना पेट्रोल पंप मिळाला; अथवा ना नितेश आणि समीरला नोकरी मिळाली नाही. एवढेच नाही तर, रक्कमही परत दिली नाही.

**'बंटी-बबली' चालाख जोडी :**

एकाच शहरातील तिघांना लाखोंचा गंडा घालणारी ही बंटी-बबली जोडी चालाख आहे. आपले वरपर्यंत संबंध असल्याचे भासवून आणि गोड बोलून या पती-पत्नीने सलग दोन वर्षांच्या काळात पैसे उकळले. मात्र त्यांच्या चालाखीमुळे आपली फसवणूक होत असल्याचे लक्षातच आले नाही. पोलिसांनी त्यांच्या पत्त्यावर जाऊन ब्रह्मपुरीत शोध घेतला, मात्र ते पसार झाले असल्याचे आढळले.

या तिघांनीही लाखांदूर पोलिसात तक्रार दाखल केली. रूपेश गावतुरे यांच्या तक्रारीवरून लाखांदूर पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपीविरुद्ध फसवणुकीच्या वेगवेगळ्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस निरीक्षक सचिन पवार करत आहेत.

# सुंदर ब्रम्हपुरी शहराचे स्वप्न साकारण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील - आम. विजय वडेट्टीवार

## ४३ कोटींच्या विकास निधीतून तलाव व बाजाराचे सौंदर्यीकरण

ब्रम्हपुरी/का.प्र.

'मी ब्रम्हपुरी क्षेत्राचा लोकप्रतिनिधी होण्यापूर्वी मागील दहा वर्षाच्या काळात ब्रम्हपुरी शहरासह संपूर्ण विधानसभा क्षेत्र विकासात्मक दृष्ट्या मागासलेला होता. तसेच विरोधी बाकावर बसून मी माझ्या अनुभवाच्या बळावर कोट्यावधींचा विकास निधी खेचून आणला. त्याचे आज फलित म्हणून संपूर्ण विधानसभा क्षेत्राचा झपाट्याने विकास होत असून शिक्षणाची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ब्रम्हपुरी शहराला भरघोस विकास निधीतून सुंदर शहर म्हणून ओळखल्या



जाणार असून मी या शहरासह संपूर्ण विधानसभा क्षेत्राच्या विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहीन,' असे प्रतिपादन राज्याचे लोकलेखा समिती अध्यक्ष तथा विधिमंडळ पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रम्हपुरी येथे नुकताच संपन्न झालेल्या ४३ कोटींच्या विकास कामांच्या भूमिपूजन सोहळ्याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलत होते.

आयोजित भूमिपूजन सोहळ्यास प्रामुख्याने प्रमुख उपस्थिती म्हणून चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. देविदास जगनाडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, माजी जि.प.सभापती डॉ.राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, माजी नगरसेवक हितेंद्र राऊत, न.प.माजी उपाध्यक्ष अशोक रामटेके, मुख्याधिकारी अर्शिया जुही, माजी न.प.उपाध्यक्ष बंटी श्रीवास्तव, माजी नगरसेवक महेश भर्रे, प्रितीश बुरले, माजी नगरसेवक सागर आमले,माजी नगराध्यक्षा वनिता ठाकूर, माजी नगराध्यक्षा योगिता बनपुरकर, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्षा योगिता आमले, कृउबा उपसभापती सुनीता तिडके, माजी नगरसेविका अंजली उरकुडे यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रसंगी चिमूर-गडचिरोली क्षेत्राचे खासदार डॉ. नामदेव किरसान यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्रास्ताविक मुख्याधिकारी अर्शिया जुही यांनी तर सुत्रसंचलन इंजी.मंगेश बोंद्रे यांनी केले. आभार इंजी. अविनाश बंडावार यांनी मानले. आयोजित भूमिपूजन सोहळा कार्यक्रमास काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शहरातील नागरिक उपस्थित होते.

# चिंचोली येथे संभाजी ब्रिगेडची शाखा, अध्यक्षपदी रूपेश कुथे

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील चिंचोली गावात संभाजी ब्रिगेड या संघटनेची ग्रामशाखा नुकतीच



उत्साहात स्थापन करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन तालुकाध्यक्ष सुरज तलमले यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. या वेळी संभाजी ब्रिगेडचे तालुका उपाध्यक्ष स्वप्नील राऊत, ब्रम्हपुरी शहराध्यक्ष राजेश माटे, मराठा सेवा संघाचे विलास दुपारे, विश्वास हुमने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी संघटनेच्या कार्याची माहिती देत तिच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. संभाजी ब्रिगेड ही सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणारी पुरोगामी विचारधारेची संघटना असून, ती महापुरुषांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी काम करते. सामाजिक विषमता दूर करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणे हे या संघटनेचे प्रमुख ध्येय आहे. कार्यक्रमात संघटनेचा इतिहास, कार्यपद्धती व भविष्यातील दिशा यावर सविस्तर माहिती देण्यात आली.

या प्रसंगी रुपेश कुथे यांची संभाजी ब्रिगेड चिंचोली ग्रामशाखेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. तसेच उपाध्यक्षपदी गुरुदेव बुल्ले, सचिवपदी गणेश बगमारे, कोषाध्यक्षपदी आकाश ठेंगरी, तर सदस्यपदी – आकाश कुथे, जयंत राऊत, रोशन मेश्राम, प्रमोद ढोरे, उमेश ढोरे, प्रदीप तोंडरे, राकेश ढोरे, विकास पत्रे, अरविंद बरडे आणि मंगेश सिंगाडे यांची निवड करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र नियुक्तीपत्र देण्यात आले.

# शहरात पाईपलाईन टाकतांना रस्त्यांची दुरवस्था



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी शहरात नगर परिषद तर्फे नवीन पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. ही शासनाची योजना आहे , शहराच्या विकासासाठी ही योजना आवश्यक आहे. परंतु ही योजना राबवितांना या कामाचे ठेकेदार नियोजनबद्ध पद्धतीने काम करून राहिले नाहीत.

पाईप लाईन टाकण्यासाठी सिमेंट, डांबरी, मातीचे रस्ते मधोमध फोडत आहेत. रस्ते फोडत असतांना तिथे गड्डा पडतो, मधोमध मातीचा ढिगारा तयार होतो व तो तसाच ठेवला जातो. या रस्त्याने चालतांना सिनियर सिटीझन, दिव्यांग व्यक्ती, सामान्य जनता , सायकल, बाईक, कार चालविणाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. रात्री अंधारात तर अपघात होण्याची शक्यता पण आहे.

त्यामुळे रस्ते खोदतांना पाईप टाकल्याबरोबर ते गड्डे किंवा उंचवटा रोड रोलर फिरवून ती जमीन समतल करावी अशी मागणी राजू भागवत महामंत्री, भाजपा ओबीसी मोर्चा शहर यांनी नगर परिषद प्रशासनाला केली आहे.

❀❀❀❀❀❀❀

# १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिम

# ब्रम्हपुरी महसूल विभाग नागपूर विभागातून द्वितीय क्रमांकावर

ब्रम्हपुरी/का.प्र.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या राज्य शासनाच्या '१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम' अंतर्गत विभाग स्तरावर सर्वोत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या महाराष्ट्रातील तालुकास्तरीय शासकीय कार्यालये दुसरा टप्पा निवड यादी १६ मे शुक्रवारला राज्य शासनाने जाहीर केली. यामध्ये नागपूर महसूल विभागातील उपविभाग कार्यालय स्तरातून ब्रम्हपुरी उपविभाग कार्यालयाला द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.



राज्य शासनाच्या या मोहिमेत सहभाग घेत द्वितीय क्रमांक पटकावून ब्रम्हपुरी महसूल उपविभागाने राज्यात तालुक्याच्या नावलौकिकतेत अधिक भर घातली आहे. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत वेबसाईट सुधारणा, कार्यालयीन सोईसुविधा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान, गुंतवणुकीस चालना, तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी १० मुद्यांवर सर्व शासकीय कार्यालयांमध्ये स्पर्धा होती. या कार्यक्रमात कार्यक्षमता, पारदर्शकता आणि सेवा विषयक गुणवत्तेचे निकष गृहीत धरून क्वालिटी कांउसिल ऑफ इंडियाकडून मूल्यांकन करण्यात आले. या सर्व निकषांमध्ये भरीव कामगिरी करीत आपल्या कार्यपद्धतीतील सुधारणा, वेगवान निर्णयप्रक्रिया, आणि उत्पादन क्षमतेत वाढ साधली. सर्व शासकीय विभागांच्या प्रत्येक महसूली विभागातील दुसऱ्या टप्प्यातील उत्कृष्ट ३ तालुका कार्यालयांची निवड शुक्रवार दिनांक १६ मे २०२५ ला जाहीर करण्यात आली. यामध्ये नागपूर महसूल विभागातील उपविभागीय कार्यालय स्तरातून ब्रम्हपुरी उपविभागीय कार्यालयाला द्वितीय क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. महसूल विभागाचे यश हे इतर सार्वजनिक उपक्रमांसाठी प्रेरणादायक ठरणार आहे. हे महसूल विभागाचे सांघिक यश आहे. नागरिकांना अधिक चांगल्या सेवा देण्याकरता कटिबद्ध असल्याचे उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांनी म्हटले आहे.

## एसएससी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थीनींचा अभिनंदन सोहळा



ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक ने.हि. कन्या विद्यालय, ब्रम्हपुरी येथे दिनांक १६ मे २०२५ ला एस एस सी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थिनींची सत्कार करण्यात आला. यावेळी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया, मुख्याध्यापिका पी.व्ही. बनपुरकर मॅडम, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, दलाल मॅडम, पालक प्रतिनिधी गरुडेश्वर पडोळे व पालक वर्ग उपस्थितीत होते.

विद्यालयाचा इयत्ता १० वी बोर्ड परीक्षेचा निकाल ९४.७८ टक्के लागला असून विद्यालयाने ब्रह्मपुरी तालुक्यातून उत्कृष्ट निकाल देण्याची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातून सेमी इंग्रजी माध्यमातून प्रथम आलेली कु. विद्या गरुडेश्वर पडोळे, द्वितीय कु. भार्गवी वासुदेव हटवार, तृतीय कु. दिव्यांनी ओमप्रकाश ठेंगरे, चतुर्थ कु. गाथा उद्धव फुलझेले व कु. माही चंद्रशेखर पेलणे, पाचवी कु. तोषवी सुरपाम तसेच मराठी माध्यमातून प्रथम कु. श्रेया नंदलाल पिलारे , द्वितीय कु. अदिती मदन गुरपुडे या सर्व विद्यार्थिनींची सत्कार करण्यात आला.

अशोकजी भैया यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्पर्धात्मक युगात आपण कशा प्रकारे वाटचाल करायची, याविषयी मार्गदर्शन केले व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्याध्यापक निखारे सर यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका बनपुरकर मॅडम यांनी निकालाची माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन शेंडे मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन नगराळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकवृंद आणि प्रशासकीय कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## जनता कन्या विद्यालयात अभिनंदन सोहळा

नागभीड/प्रतिनिधी

जनता कन्या विद्यालयाने यावर्षी सुद्धा आपल्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



राखीत नागभीड शहरामधून व परिसरातील विद्यालयांपैकी सर्वाधिक ८८.०९ टक्के निकाल दिलेला आहे.

कु. शिवानी गजानन मारबते या विद्यार्थिनीने सर्वाधिक ८४.६० टक्के गुण प्राप्त करून विद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळविला. तर कुमारी श्रुती उत्तम बनसोड या विद्यार्थिनीने ८३.८० टक्के व प्रणाली दिलीप सातपैसे या विद्यार्थिनीने ८२.४० टक्के गुण प्राप्त करून अनुक्रमे द्वितीय व तृतीय आलेल्या आहेत.

विद्यार्थिनींचा सन्मान सोहळा दिनांक १४ मे २०२५ ला जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.अमीर धम्माणी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून संस्था सचिव डॉ. रवींद्र कावळे, उपाध्यक्ष चक्रधरजी रोहनकर, सहसचिव प्रा.रवींद्र समर्थ, प्राचार्या आर.आर. तरारे, पर्यवेक्षक एस.डी. जाधव, पालक वर्गातून श्रीकांत समर्थ, रुपेश कडू, श्रीधर शंभरकर इत्यादी मान्यवर तथा शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन सहा. शिक्षक सतीश मेश्राम यांनी केले तर आभार सहा.शिक्षक सतीश नरडंगे यांनी मानले.

## वाघाच्या हल्ल्यात नऊ दिवसांत आठ बळी

तळोधी (बा)/प्रतिनिधी

चंद्रपुर जिल्ह्यात दि. १० मे पासून तर रविवार पर्यंत एकूण आठ जणांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. त्यामध्ये सहा महिलांचा समावेश आहे.

दि. १० मे रोजी सिंदेवाही तालुक्यातील मेंढामाल गावातील सारिका शालीक शेंडे (५५), कांता बुद्धाची चौधरी (६०), शुभांगी मनोज चौधरी (३१) ह्या महिला तेंदुपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेल्या होत्या. तेंदुपत्ता तोडत असतानाच एकापाठोपाठ तिघींनाही डोंगरगाव बीटातील १३५५ कंपार्टमेंट मध्ये वाघिणीने ठार केले. या मध्ये एकाच कुटुंबातील सासू व सुनेचा समावेश आहे. दि. ११ मे रोजी मूल तालुक्यातील नागाळा गावातील विमल बुद्धाजी शेंडे ही महिला चिचप्पली वनपरिक्षेत्रातील ५३७कंपार्टमेंटमध्ये तेंदुपत्ता तोडण्यासाठी गेली होती. त्या ठिकाणी वाघाने वृद्ध महिलेवर हल्ला केला. यामध्ये ती ठार झाली. दि. १२ मे रोजी मूल तालुक्यात वडीलांकडे राहत असलेल्या भादुर्णा येथील भूमिका दिपक भेंडारे ही महिला आई, वडील, काका, काकू आणि नवऱ्यासह बफर क्षेत्रातील भादुर्णा बिटातील ७९३ मध्ये गेली होती. जंगलात तेंदुपत्ता तोडत असतानाच पतीसमोरच तिला वाघाने ठार केले. दि. १४ मे रोजी बुधवारी चिमूर तालुक्यातील पळसगाव वनपरीक्षेत्रामधील करबडा येथील कक्ष क्र ८६२ मध्ये कचराबाई अरुण भरडे (५४) ही महिल महिला तेंदूपत्ता तोडण्यासाठी गेली होती. सकाळी नऊच्या सुमारास वाघाने तिला ठार केले. दि. १८ मे रोजी रविवारी नागभीड व मूल

(उर्वरित पान क्र. ६ वर)

**... QUOTES ...**

**"A great man is different from an eminent one in that he is ready to be the servant of the society."**

**- Dr. B.R. Ambedkar**

**चारोळी**

बफेमध्ये जेवताना ते अभ्याने
प्लेटभोवती पाणी फिरवतात...
बियर सोबत पार्लेबिस्किट आणि
पुरणपोळी सोबत कैरी खातात...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# डाक विभागाच्या रकमेवर डाक अधिकाऱ्याचाच डल्ला

ब्रह्मपुरी/महेश पिलारे

पोस्ट ऑफिस किंवा बँकेतील रक्कमेची अफरातफर केल्याच्या अनेक घटना सद्यस्थितीत घडून येत आहेत. तेथीलच अधिकारी किंवा कर्मचारी सदर रक्कमेची अफरातफर करणारे असतात. तसंच काहीसा प्रकार ब्रह्मपुरी तालुक्यात सुद्धा पहावयास मिळत आहे. ब्रह्मपुरी येथील पोस्ट ऑफिस मध्ये उप डाकपाल या हुद्द्यावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने कुंपणच शेत खातो' या म्हणी प्रमाणे काम करीत भारतीय डाक विभागाच्या कोषागारातील रक्कमेवर डल्ला मारून, रक्कम फस्त केली. सदर बाब उघडकीस आल्यानंतर उप विभागीय डाक निरीक्षक चांदा पूर्व उपविभाग ब्रह्मपुरी यांनी रोकड गहाळ केल्याप्रकरणी ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद केला आहे.

फिर्यादी रवींद्र भस्मे उपविभागीय डाक निरीक्षक चांदा पूर्व उपविभाग ब्रह्मपुरी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, ब्रह्मपुरी पोस्ट ऑफिस येथे कार्यरत तत्कालीन उप डाकपाल निलेश लिंगायत हे सुट्टीवर गेल्यामुळे त्यांचा पदभार प्रविण दिगांबर गराडे यांनी सांभाळला. प्रविण दिगंबर गराडे हे दिनांक २० ऑगस्ट २०१९ ते ०९ जुलै २०२२ पर्यंत तत्कालीन उप डाकपाल म्हणून ब्रह्मपुरी पोस्ट ऑफिस येथे कार्यरत होते. त्यांच्याकडे उप डाकपाल पदाव्यतिरिक्त ट्रेझरी, एमपीसीएम काउंटर, सब अकाउंट या शाखेचा सुद्धा चार्ज होता. तत्कालीन काळात प्रविण गराडे यांनी ट्रेझरीमध्ये असलेल्या एकूण रक्कमेपैकी १ लाख ९८ हजार ९६५ रुपये एवढी रक्कम भारतीय डाक विभागाचा विश्वासघात करत परस्पर वापरली. सदर बाब तत्कालीन उप डाकपाल निलेश लिंगायत त्यांच्या लक्षात आली. त्यांनी सदर बाब वरिष्ठ डाक अधिक्षक चंद्रपूर यांना कळविले. वरिष्ठ डाक अधिक्षक चंद्रपूर यांनी तत्कालीन उपविभागीय डाक निरीक्षक यांना चौकशीचे आदेश दिले. चौकशी अंती तत्कालीन उप डाकपाल प्रविण दिगंबर गराडे यांनी पदाचा दुरुपयोग करीत, भारतीय डाक विभागाच्या रोकडे मध्ये अफरातफर करून, शासकीय हिशोबातून १ लाख ९८ हजार ९६५ इतकी रक्कम गहाळ करीत परस्पर वापरली व भारतीय डाक विभागाचा विश्वासघात केल्याचे सिद्ध झाले.

त्यामुळे आरोपी प्रविण दिगंबर गराडे तत्कालीन उप डाकपाल (सध्या डाक सहाय्यक चंद्रपूर सिटी उप डाकघर) याच्याविरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता, कलम ४०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास ब्रह्मपुरी पोलीस करीत आहेत.

## ब्रम्हपुरीत भव्य तिरंगा रॅली, सैनिकांचे कौतुक...

(पान क्र. १ वरून)

शहरातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांना आयोजन समितीच्या वतीने अभिवादन करण्यात आले. रॅलीमध्ये विविध संघटनेच्या वतीने भारतीय सैन्याच्या अभिनंदनाचे फलक झळकत होते. रॅलीत भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ घोषणा दिल्या जात होत्या. तसेच पाकिस्तानचा निषेध केला जात होता.

यावेळी रॅलीत माजी नगरसेवक गौरव भैया, माजी जि.प.उपाध्यक्ष क्रिष्णा सहारे, उद्योजक दिपक उराडे, जिल्हा सचिव भाजयुमो तनय देशकर, भाजपा तालुकाध्यक्ष अरूण शेंडे, शहर अध्यक्ष अरविंद नंदूरकर, विभाग संघचालक प्रा. जयंत खरवडे, एकात्मता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब कहारे, इकबाल जेसानी, माजी नगरसेवक मनोज वठे, माजी नगरसेवक मनोज भुपाल, माजी नगरसेवक विलास विखार, डॉ. गोकुलदास बालपांडे, मंगू झाबडा, विराभद्र पोट्टरवार, प्रा.कादर शेख, अमित मेंढूले, साकेत भानारकर, विठ्ठल तुमडे, डॉ. राहूल मेश्राम, महिला आघाडी अध्यक्ष वंदना शेंडे यांच्यासह असंख्य नागरिक, विद्यार्थी, विद्यार्थीनी व महिलांची उपस्थिती होती.


Miracle constructions & Developers



श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
ड्युप्लेक्स बांधकाम करून मिळेल.


## तलावाची पाळ दुरुस्तीची...


(पान क्र. १ वरून)

पावसाच्या पाण्याची साठवण तलावात होणार नाही व त्यामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी सिंचनाकरीता पाणी उपलब्ध होणार नाही. याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे. बळीराजाचे प्रचंड नुकसान होणार आहे. या व्यतिरिक्त पाण्याची साठवणूक न झाल्यास भूमीगत पाण्याची पातळी खालावण्याची शक्यता आहे. विहिरीत पाणी उपलब्ध राहणार नसल्याची परिस्थिती निर्माण होण्याची संभावना आहे.

या संदर्भात आमदार विजय वडेट्टीवार यांना कळविण्यात आले आहे. त्यांनी प्रकरणाची दखल घेऊन सक्षम अधिकाऱ्यांना त्वरीत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. परंतु प्रशासनाने अद्याप दखल न घेतल्याने 'जैसे थे' परिस्थिती कायम आहे.

वाचाल तर वाचाल..


सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
(पान क्र. १ वरून)



गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




## वाघाच्या हल्ल्यात नऊ दिवसांत...

(पान क्र. ५ वरून)

तालुक्यात दोघांचा वाघाने बळी घेतला. त्यामध्ये नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील मारोती नकडू शेंडे (६४) हा इसम तेंदुपत्ता तोडण्यासाठी जंगलात गेला होता. वाघाने त्याला ठार केले. तर मूल तालुक्यातील भादुर्णी येथील ऋषी झुगांजी पेंदोर (७०) हा जंगलात बकऱ्या चरण्यासाठी गेला होता. वाघाने त्याला ठार करून शरीराचे पूर्ण अवयव खाल्ले आहे.

वन विभागाने या जंगल परिसरात गस्त वाढवून नरभक्षक वाघाला जेरबंद करावे, अशी ही मागणी असून वाघाच्या दहशतीमुळे अनेकांवर घरी बसण्याची पाळी आली आहे.

## कुथे पाटील कॉन्व्हेंटमध्ये गुणवंतांचा सत्कार सोहळा

देसाईगंज/प्रतिनिधी

इयत्ता १० वीच्या निकालात देसाईगंज येथील कुथे पाटील इंग्लिश हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला असून, यात कु. अश्लेषा नरेश कनोजिया हया विद्यार्थीनीने ९४.४० टक्के गुण मिळवून तालुक्यातून प्रथम व जिल्ह्यातून चतुर्थ क्रमांकावर येण्याचा मान मिळवला.

विद्यालयातून एकूण १३ विद्यार्थी परिक्षेला प्रविष्ठ झाले होते. त्यात १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असुन विद्यालयाचा निकाल १०० टक्के आहे.

विद्यालयात प्रथम येणाऱ्या कु. अश्लेषा नरेश कनोजिया हीचा पुष्पगुच्छा देऊन सर्व शिक्षकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मा. आमदार रामदास मसराम हे उपस्थित होते. त्यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन भविष्याच्या वाटचालीसाठी शुभेछ्या दिल्या. तसेच संस्थेच्या वतीने मा. जेसाभाऊ मोटवानी यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीकरिता मोलाचे मार्गदर्शन केले.

नियमित वाचा
**अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार**




Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404